वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि.१४ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# आहो, मुंडे साहेब स्व.संतोष देशमुख, महादेव मुंडे यांना जिवे मारले तेव्हा आपण गप्प का?

# आहो, मुंडे साहेब जनाची नाही तर मनाची तरी ठेवा

## स्व.संतोष देशमुख यांना जिवाच्या अतोनात मारले त्याविषयी एक शब्दही नाही निघला

## धनंजय मुंडे म्हणतायेत महाराष्ट्रात सामाजिक समता संपत आलीय

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com





नागपुर, (दिव्य न्युज):- महाराष्ट्रात आजघडीला सामाजिक आंदोलन करणारा कार्यकर्ता सुरक्षितपणे फिरु शकत नाही. या महाराष्ट्रातील सामाजिक समता संपली आहे, असे वक्तव्य परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांनी केले. ते रविवारी विधानसभेत बोलत होते. यावेळी त्यांनी सभागृहात ॲड. मंगेश ससाणे यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा मुद्दा उपस्थित करत राज्यातील कायदा व सुव्यवस्थेविषयी चिंता व्यक्त केली.

धनंजय मुंडे यांनी सभागृहात ओबीसी आंदोलक ॲड. मंगेश ससाणे यांच्यावरील हल्ल्याबाबत सविस्तर भाष्य केले. प्रसिद्ध वकील व ओबीसी आंदोलन अभ्यासक मंगेश ससाणे यांच्या वाहनावर मध्यरात्री हल्ला झाला. काही दिवसांपूर्वी लक्ष्मण हाके यांच्या सहकाऱ्यावर माजलगावमध्ये जीवघेणा हल्ला झाला होता. काही जणांनी झुंड करुन त्याचे हातपाय तोडले. तो अजूनही व्यवस्थितरित्या चालू शकत नाही. यामधील एकही आरोपी पकडला गेलेला नाही. ओबीसी आंदोलक वाघमारे यांच्यावरही हल्ला झाला होता. त्यामुळे आजघडीला महाराष्ट्रात सामाजिक आंदोलन करणारा कार्यकर्ता सुरक्षितपणे फिरु शकतो का?, हा प्रश्न आहे. या महाराष्ट्रातील सामाजिक समता संपली आहे. एकमेकांना मारुन सोशल मीडियावर स्टेटस ठेवली जातात, मारहाण करणाऱ्यांना योद्धा म्हटले जाते. त्यांना अटक होत नाही. एकाला शिक्षा होते. परंतु, सारखाच गुन्हा असलेल्या दुसऱ्याला शिक्षा होत नाही. या सगळ्यामुळे महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था उरली आहे की नाही, हा प्रश्न पडतो, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले. यावर राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात तात्काळ उत्तर दिले. परंतु, देवेंद्र फडणवीस यांचे हे उत्तर मोजक्या ▶▶ पान २ वर

## फुलसांगवी शिवारात बिबट्याने पाडला घोडा अन् मेंढीचा फाडशा

शिरूर, (दिव्य न्युज):-तालुक्यातील फुलसांगवी या गावाच्या शिवारामध्ये पश्चिम महाराष्ट्रातून आलेल्या मेंढपाळांच्या जागली वरती बिबट्याने हल्ला चढवून मेंढपाळाच्या घोड्याची मेंढीची शिकार केली आहे. बिबट्याच्या या हल्ल्यामुळे फुलसांगवी परिसरामध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे.

शिरूर कासार तालुक्यातील मौजे फुलसांगवी या गावाच्या परिसरामध्ये रब्बी हंगामाची शेतीची कामे मोठ्या जोमाने चालू आहेत. एकीकडे शेतकऱ्यांना शेतातील कामे वेळेत करणे आव्हानात्मक झाले असताना या कामांना आता बिबट्याच्या दहशतीची मोठी खेळ बसली आहे. शिरूर कासार तालुक्यामध्ये बिबट्याच्या दहशतीने शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी पान २ वर



## भूसंपादन घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकारी मुधोळ-पाठक सह्यांची होणार तपासणी

मुंबई, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील २४१ कोटी ६२ रुपयांच्या भूसंपादन घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची सही बनावट होती की नाही, याची तपासणी राज्य गुन्हा अन्वेषण विभागाकडून केली जाणार आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या तीन आरोपीची दूरध्वनी संभाषणाचे विश्लेषण पूर्ण झाले आहे. या प्रकरणात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केलेल्या चौकशीतून ७३ कोटी रुपयांचा अपहार उघडकीस आला होता. या प्रकरणातील तपास बराच पुढे ▶▶ पान २ वर




## महाराष्ट्रात डीजे मुक्त पॅटर्न

### सोलापुर पॅटर्न लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात लागू होणार

नागपूर, (दिव्य न्युज):- राज्यात वाढत्या ध्वनी प्रदूषणामुळे नागरिक त्रस्त असून त्याचा थेट परिणाम आरोग्यावरही होत असल्याचे चित्र आहे. या



पार्श्वभूमीवर सोलापूर शहराने 'डीजे-मुक्त शहर' ही संकल्पना यशस्वीपणे राबवली असून हाच पॅटर्न संपूर्ण राज्यात अमलात आणून महाराष्ट्र डीजे-मुक्त करावा, अशी मागणी भाजपचे विधानपरिषद सदस्य श्रीकांत भारतीय यांनी केली. विधानपरिषदेत लक्षवेधी ▶▶ पान २ वर

## वक्फच्या इतिहासात पहिल्यांदाच ऑडिट रिपोर्ट सदनाच्या पटलावर

### अध्यक्ष समीर काझी यांच्या प्रभावी कार्यशैलीची चुणूक



बीड, (दिव्य न्युज):- छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ऑडिट रिपोर्ट विधानसभेच्या पटलावर ठेवण्यात आलंय.विशेष म्हणजे वक्फ मंडळाच्या इतिहासात हे पहिल्यांदाच घडलं.मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या प्रयत्नाने हे अभूतपूर्व यश मिळाले आहे.विधानसभेच्या पटलावर पहिल्यांदाच ऑडिट रिपोर्ट आल्याने सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या बड्या नेत्यांनी समीर काझी यांचे ▶▶ पान २ वर

## कश्मकश, दिव्य वार्ताच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी दि. १ जानेवारी पर्यंत प्रस्ताव पाठवावेत

### पत्रकार, छायाचित्रकार, डॉक्टर, इंजिनिअर, वकील, नगरसेवक, समाजसेवक, कलाकार, गायक, संगीतकलाकार, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी आदिंनी प्रस्ताव सादर करावेत



बीड (दिव्य न्यूज):- बीड येथून प्रकाशित होणाऱ्या दै.दिव्य वार्ता व साप्ताहिक कश्मकश आणि महाराष्ट्र मुस्लीम पत्रकार फाऊंडेशनच्या वतीने पंधराव्या वर्धापन दिनानिमित्त दिल्या जाणाऱ्या २०२४-२५ च्या राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय पुरस्कार देण्याचे हे पंधरावे वर्ष असुन सर्व समाजातील एक-एक अशा उत्कृष्ट काम करणाऱ्या पत्रकार, छायाचित्रकार, डॉक्टर, इंजिनिअर, वकील, नगरसेवक, समाजसेवक, कलाकार, गायक, संगीतकलाकार, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी आदिंनी प्रस्ताव सादर करावेत. मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून त्या करिता या क्षेत्रातील मान्यवरांनी आपल्या संपूर्ण माहितीसह दि.१ जानेवारी २०२६ पर्यंत प्रस्ताव समितीकडे सादर करावेत. सदर प्रस्ताव ▶▶ पान २ वर

### आपले प्रस्ताव स्वत: किंवा पोस्टाने या पत्यावर पाठवावेत

कश्मकश, दिव्यवार्ता कार्यालय, नगर परिषद कॉम्पलेक्स, वन विभाग कार्यालयाच्या बाजूला, शहेंशाह नगर, फारूक पटेल यांच्या घरासमोर, बीड ता.जि.बीड ४३११२२, मो.९५४५३८१२२०, ९३७१२९१०४२, ९१३०९०९०५०

## वक्फ मंडळाच्या ६५ टक्के जमिनी भूमाफियांनी बळकावल्या

### हक्क असलेल्या धार्मिक व शैक्षणिक संस्था आर्थिक संकटात, अधिकाऱ्याच्या निष्क्रियतेवर शासन गप्प का? विधान परिषदेत प्रश्न उपस्थित

नागपूर, (दिव्य न्युज):- छत्रपती संभाजीनगर येथील वक्फ मुख्यालयात कार्यरत असलेले अधिकारी हे निष्क्रिय आणि सतत कर्तव्याकडे दुर्लक्ष करणारे असल्यामुळे ६५ टक्के वक्फ संपत्तीवर भूमाफियांनीच बेकायदा कब्जा केला आहे. अधिकाऱ्यांच्या या निष्क्रियतेकडे शासन दुर्लक्ष का करतो, असा प्रश्न विधान परिषदेत प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केला.



राज्य वक्फ मंडळाच्या नोंदीनुसार ५२ हजार ६९९ हेक्टर वक्फ मालमत्ता आहेत. त्यापैकी ६५ टक्के जमिनीवर अतिक्रमण झाल्यामुळे वक्फ संस्थांना मिळणारे उत्पन्न थांबले आहे. या उत्पन्नावर अवलंबून असणारे अनाथ आश्रम, मदरसे, कब्रस्तान,दवाखाने, धार्मिक व शैक्षणिक संस्था यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. याला संबंधित विभाग तसेच महसूल यंत्रणा, वक्फ मंडळातील काही अधिकारी जबाबदार आहेत. या विरोधात अनेक तक्रारी दाखल होतात. मात्र, शासनस्तरावर याकडे दुर्लक्ष

होते, असा आरोप प्रवीण दरेकर यांनी शनिवारी (दि. १३) विधान परिषदेच्या सभागृहात केला आहे.दरेकर यांनी प्रश्नात पुढे म्हटले आहे की,वक्फ जमिनीविषयीची ▶▶ पान २ वर

## पीएम मोदी ज्या 'मनेरगा'ला काँग्रेसच्या ६० वर्षांच्या सत्तेच्या अपयशाचे जिवंत स्मारक म्हणाले

# त्याचं योजनेचं आता नाव बदलून नव्यानं आणली! आमच्या ३२ योजनांचं तेच केलं, काँग्रेसचा हल्लाबोल

दिल्ली, (वृत्तसेवा):- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याचे आता पूज्य बापू ग्रामीण रोजगार योजना असे नामकरण केलं जाणार आहे. शुक्रवारी केंद्रीय मंत्रिमंडळाने या कायद्याचे नाव बदलून कामाच्या दिवसांची संख्या वाढवण्याच्या विधेयकाला मंजुरी दिली. पीटीआय या वृत्तसंस्थेने सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, कामाच्या दिवसांची संख्या १०० वरून १२५ दिवसांपर्यंत वाढवली जाईल. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, ज्याला मनरेगा (मनरेगा) किंवा नरेगा (नरेगा) असेही म्हणतात, ही ग्रामीण भागातील कुटुंबांची उपजीविका सुरक्षितता वाढवण्याच्या उद्देशाने एक विशेष सरकारी योजना आहे. विशेष म्हणजे याच योजनेवरून २०१५ मध्ये पीएम मोदी यांनी संसदेत बोलताना मनरेगा काँग्रेसच्या ६० वर्षांच्या अपयशाचे जिवंत स्मारक म्हटले होते. या योजनेअंतर्गत, ज्या कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य स्वेच्छेने अकुशल काम करण्यास स्वेच्छेने येतात त्यांना आर्थिक वर्षात किमान १०० दिवसांचे हमी वेतन काम दिले जाते. २००५ मध्ये ही योजना लागू करण्यात आली.

खासदार प्रियांका गांधी म्हणाल्या की, मनरेगा योजनेचे नाव बदलण्याच्या निर्णयामागील तर्क त्यांना समजत नाही, ज्यामुळे खर्चाचा अपव्यय होतो. त्या म्हणाल्या, यामागील मानसिकता मला समजत नाही. सर्वप्रथम, हे महात्मा गांधींच्या नावावर आहे आणि जेव्हा ते



बदलले जाते तेव्हा सरकारी संसाधने पुन्हा खर्च होतात. कार्यालयीन साहित्यापासून ते स्टेशनरीपर्यंत सर्व काही नाव बदलावे लागते, ज्यामुळे ती एक मोठी आणि महागडी प्रक्रिया बनते. मग हे करण्याचा काय अर्थ आहे?

काँग्रेसच्या सुप्रिया श्रीनेत यांनी मनरेगाच्या नाव बदलण्याबाबत एक व्हिडिओ शेअर केला. त्यात त्या म्हणाल्या, नरेंद्र मोदींनी मनरेगाचे नाव बदलून पूज्य बापू ग्रामीण रोजगार योजना असे ठेवले आहे. मोदी या मनरेगाला काँग्रेसच्या अपयशांचा गठ्ठा म्हणत असत, परंतु वास्तव हे आहे की ही मनरेगा ग्रामीण भारतासाठी जीवनरेखा ठरली आहे. काँग्रेसच्या योजनांचे नाव बदलून त्यांना स्वतःचे बनवण्याची मोदींची सवय जुनी आहे. ते ११ वर्षांपासून हेच करत आहेतय यूपीए योजनांचे नाव बदलणे आणि प्रसिद्धी मिळविण्यासाठी त्यावर स्वतःचा शिक्का मारणे. सुप्रिया यांनी काँग्रेसने सुरू केलेल्या योजनांची नावे दहा तारखेला शेअर केली. त्यांनी असाही दावा केला की बदल करण्यात आले आहेत.केंद्र सरकारच्या मनरेगा योजनेचे नाव पूज्य बापू ग्रामीण रोजगार योजना असे बदलल्याच्या वृत्तांवर, शिवसेना (यूबीटी) खासदार प्रियंका चतुर्वेदी म्हणाल्या की, असे निर्णय निराशेतून घेतले जात आहेत. हे लक्ष विचलित करण्याचा आणखी एक मार्ग आहे. वंदे मातरमवरील चर्चेमुळे जनतेला समजले आहे की इतिहासाचे व्हॉट्सअॅप आवृत्ती कोणती आहे आणि खरी आवृत्ती कोणती. त्यामुळे, व्हॉट्सअॅप आवृत्तीवर विश्वास ठेवणारे गांधी कुटुंबावर रागावतील. ज्यांना खरा इतिहास माहित आहे ते गांधी कुटुंबाचा त्यांच्या योगदानाबद्दल नेहमीच आदर करतील.

## भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षांच्या नावाची घोषणा, मोदी-शहांचे पुन्हा धक्कातंत्र

मुंबई , (दिव्य न्युज):- मागील काही महिन्यांपासून भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी कोणता नेता विराजमान होणार, याची देशभरात चर्चा सुरू आहे. पक्षाचे नेते, पदाधिकारी त्याची आतुरतेने वाट पाहत आहेत. मात्र, त्याआधी पक्षाने राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षांच्या नावाची घोषणा केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पुन्हा धक्का दिला आहे.

भाजपच्या संघटनात्मक पातळीवर मोठा निर्णय घेण्यात आला असून ४५ वर्षांच्या नितीन नबीन यांना राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष नियुक्त करण्यात आले आहे. नबीन हे सध्या बिहार सरकारमध्ये मंत्री आहेत. पक्षाला बिहारमध्ये नुकताच ऐतिहासिक विजय मिळाला आहे. त्यामुळे या नियुक्तीला महत्व प्राप्त झाले आहे. बिहारसह राष्ट्रीय राजकारणात याकडे एक रणनीती म्हणून पाहिले जात आहे.नितीन नबीन यांचा संघटनात्मक अनुभव, तळागाळातल्या कार्यकर्त्यांनी असलेले संबंध, प्रशासकीय क्षमतेमुळे त्यांच्याकडे ही मोठी जबाबदारी सोपविण्यात आल्याचे सांगितले जात आहे. ही नियुक्ती १४ डिसेंबरपासून





तत्काळ प्रभावाने लागू होणार आहे. भाजपचे राष्ट्रीय महासचिव व मुख्यालय प्रभारी अरूण सिंह यांनी हा आदेश जारी केला आहे.

अरूण सिंह यांच्या आदेशानुसार, ही नियुक्ती भारतीय जनता पक्षाच्या संसदीय बोर्डाद्वारे करण्यात आली आहे. नितीन नबीन हे नितीश कुमार यांच्या सरकारमध्ये रस्ते विकास मंत्री आहेत. पटनातील बांकीपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार असून ते यावेळी चौथ्यांदा निवडून आले आहेत.भाजपच्या विद्यार्थी मोर्चापासून नबीन यांनी पक्ष संघटनेत काम केले आहे. विविध पदे भूषविली आहेत. संघटनेतील एक कडक शिस्तीचा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. तसेच त्यांच्या निर्णयक्षमतेची अनेकदा कौतुक झाले आहे. बिहार भाजपमध्येही त्यांनी महत्वाची भूमिका निभावली आहे. मात्र, राष्ट्रीय स्तरावर त्यांना पहिल्यांदाच एवढी मोठी जबाबदारी मिळाली आहे.

## अल्पसंख्याक संस्थांवर बिनबुडाचे आरोप सहन केले जाणार नाहीत ; वसीम बुऱ्हाण

अक्कलकुवा, (दिव्य न्युज):- भाजप नेते किरीट सोमय्या हे नेहमीच अल्पसंख्याक संस्था व व्यक्तींवर बिनबुडाचे आरोप करून अल्पसंख्याक मुस्लिम समाजाला लक्ष्य करत असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे राज्य सदस्य वसीम खाजाभाई बुऱ्हाण यांनी केला आहे. सध्या अक्कलकुवा येथील एका अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेबाबत विविध बेकायदेशीर व खोटे आरोप करून संस्थेची बदनामी करण्याचे काम सुरू असल्याची माहिती संस्थाचालकांकडून मिळाल्याचे त्यांनी सांगितले.



बुऱ्हाण यांनी म्हटले की, राज्यातील अल्पसंख्याक संस्था संविधानाने दिलेल्या अधिकारांनुसार कार्यरत आहेत. कोणतीही चौकशी किंवा कारवाई ही कायद्याच्या चौकटीत, सक्षम प्राधिकरणामार्फतच झाली पाहिजे. केवळ आरोपांच्या आधारे दबाव टाकणे, बदनामी करणे व विनाकारण त्रास देणे हे लोकशाही व कायद्याच्या राज्याला धरून नाही.ते पुढे म्हणाले, राज्यातील अल्पसंख्यांक व्यक्ती, समाज व संस्था यांच्यावर बेकायदेशीर, विनाकारण व बिनबुडाच्या कारवाया होऊ देणार नाहीत. अशा प्रकारच्या घटनांकडे अल्पसंख्यांक आयोग गांभीर्याने पाहत असून, आवश्यक त्या कायदेशीर उपाययोजना केल्या जातील.दरम्यान, संबंधित शैक्षणिक संस्थेने सर्व नियम व कायद्यांचे पालन केले असून, सत्य परिस्थिती समोर येईल, असा विश्वासही बुऱ्हाण यांनी व्यक्त केला.

पान १ वरून

### आहो, मुंडे

यासंदर्भात कड

कारवाई केली जाईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

ओबीसी आंदोलक मंगेश ससाणे यांच्या गाडीवर शनिवारी रात्री काही अज्ञातांकडून दगडफेक करण्यात आली होती. दोन महिन्यांपूर्वी पवन करवर याच्यावर झालेल्या हल्ला प्रकरणाची माहिती घेण्याकरता अॅड. ससाणे हे माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गेले होते. त्यानंतर माजलगाववरून धारूरकडे जात असताना विसावा हॉटेलच्या पुढे दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी ससाणे यांची गाडी थांबवून दगडफेक केली. अॅड. ससाणे यांनी तात्काळ धारूर पोलीस ठाणे गाठत या हल्ल्याबाबतची माहिती धारूर पोलिसांना दिली. त्यावरून धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

### वक्फ मंडळाच्या ६५

नोंद, नकाशे व कायदेशीर माहिती अद्यावत नसल्यामुळे अनेक प्रकरणांमध्ये भूमाफियांकडून बेकायदेशीर मालकी हक्क सांगण्यात येत आहे. खऱ्या गरजवंतांना दूर सारून हे माफिया वक्फच्या संपत्ती हडपत आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी वाद निर्माण होत असून, या पार्श्वभूमीवर वक्फ जमिनीचे सर्वेक्षण नोंदी व व्यवस्थापन यासाठी जीआयएस आधारित डिजिटलायझेशन प्रणाली गतिशील करणे गरजेचे आहे.

चौकट

माफियांवर होणार कारवाई

दरेकर यांच्या प्रश्नावर उत्तर देताना वक्फ विभागाचे मंत्री माणिकराव कोकाटे यांनी सांगितले की, राज्यातील वक्फ मालमत्तेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झालेली आहेत, हे खरे आहे. सदरची अतिक्रमणे ही बऱ्याच वर्षांपासूनची असून, या मालमत्तांच्या मालकी हक्काबाबत वाददेखील उद्भवत आहेत. सर्व बाबींवर उपाय करण्यासाठी वक्फ मंडळाची चतुः सीमा निश्चित करून त्यांचे उत्पन्न वाढवून भविष्यातील अतिक्रमणे रोखण्यासाठी राज्यातील सर्व वक्फ मालमत्तांचे जीआयएस मॅपिंग करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. हे काम प्रगतिपथावर आहे व मालमत्तांवर होत असलेली अतिक्रमणे हटवण्याबाबत व मंडळाकडून अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार अतिक्रमण करणाऱ्या माफियांवर कारवाई करण्यात येत आहे.

### फुलसांगवी शिवारात

घराबाहेर पडणे मोठे धास्तीचे झाले आहे.

शिरूर तालुक्यातील फुलसांगवी या गावांमध्ये शिवारामध्ये सुभाष भुजंगराव ढाकणे या फुलसांगवी मार्कडवाडी रस्त्या लगतच्या शेतकऱ्याच्या १६३ मधील शेतामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील बिगवण येथील मेंढपाळांनी मेंढ्यांचा कळप बसवलेला होता. याच ठिकाणी त्यांनी आपली जागलही ठेवली होती. रात्री एक ते दीड च्या दरम्यान या मेंढपाळाच्या जागली वरती बिबट्याने हल्ला चढवून येथील या मेंढपाळाच्या सामानाची वाहतूक करणाऱ्या घोड्याची व एका मेंढीची शिकार केली आहे. घोड्याच्या नरड्याचा चावा घेऊन त्याला गतप्राणी केले व त्याचे पोटाजवळील मांस भक्षण करून त्या ठिकाणाहून बिबट्या पसार झाला असल्याचे सांगितले आहे.

सदरील घटनेची माहिती पाटोदा वन विभागाला दिल्यानंतर वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन या घटनेचा पंचनामा केला आहे. या घटनेमध्ये सुमारे सत्तर ते पंच्याहत्तर हजार रुपये हजार रुपये किमतीचा घोडा व पंधरा ते वीस हजार रुपये किमतीची मेंढी असा सुमारे एक लाख रुपये किमतीची पशुधन बिबट्याच्या भक्षस्थानी ठरले आहेत. सदरील घटना फुलसांगवी परिसरामध्ये पहिल्यांदाच घडत असल्याने बिबट्याच्या दहशतीने परिसरातील शेतकरी वर्ग पुरताच हादरून गेला आहे. खरीप हंगामातील शेती कामालाही मोठी खिळ बसली आहे. या बिबट्याच्या लवकरात लवकर बंदोबस्त करावा आणि शेतकऱ्याला वन विभागाने भयमुक्त करावे अशी शेतकऱ्यातून मागणी जोर धरत आहे.फुलसांगवी परिसरामध्ये बिबट्याचा वावर हा शेतकऱ्यांसाठी धोका निर्माण झाला आहे. वन विभागाने ही बाब गांभीर्याने घेऊन या परिसरामध्ये आवश्यक ते प्रमाणे कॅमेरे व पिंजरा पिंजरा लावून या प्राण्यांना बंदिस्त करावे शेतकऱ्यांना भयमुक्त करावे

### भूसंपादन घोटाळ्यात

गेला असला तरी गुन्हा सिद्ध होण्यासाठी अनेक पुरावे गोळा करण्यावर अधिक लक्ष केंद्रीत असल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान करण्यात आलेल्या सह्यांची हस्ताक्षर तज्ज्ञांकडून तपासणीही केली जाणार आहे.

या गैरप्रकारात परळी येथील सहाय्यक महसूल अधिकारी संजय हांगे संगणक परिचालक अविनाश चडखण , शेख अजहर शेख बाबू व बीड येथील सेवानिवृत्त कर्मचारी विनोद पिंगळे, सहाय्यक महसूल अधिकारी पांडुरंग पाटील , ड. एस. एम. ननवरे, ड. नरवडकर, ड. पिसुरे, ड. प्रवीण राऊत आदीचा सहभाग असू शकतो,असे प्राथमिक चौकशीतून स्पष्ट झाले होते. बनावट आदेश तयार करण्याच्या गैरप्रकारात प्रमुख अधिकारी - कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल केल्यानंतर घोटाळा समोर आला होता. जुन्या तारखांचे ४० लवाद आदेश आढळून आले होते.

तत्कालीन जिल्हाधिकरी यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी करून दि. १ मार्च २०२५ ते १७ एप्रिल २०२५ पर्यंतच्या १५४ बनावट आदेश निर्गमित करण्यात आले होते. यातील सर्व कागदपत्रे आणि संचिका पोलिसांनी ताब्यात घेतल्या असून या प्रकरणाचा खरा सूत्रधार कोण, हे तपासण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. या प्रकरणात घडलेल्या गुन्ह्याचा तपास केल्यानंतर तो कागदोपत्री सिद्ध करण्यासाठी आवश्यक ते पुरावे गोळा केले जात असल्याचे सांगण्यात आले. बनावट सह्या, दूरध्वनीवरील संभाषणासह सर्व पुरावे गोळा करुन कारवाईची दिशा ठरवली जाईल असे पोलिसांनी सांगितले.या प्रकरणातील आरोपींचे जबाब आणि दूरध्वनीवरील संभाषणाचे विश्लेषण पूर्ण झाले आहे. सह्या बनावट होत्या की नाही, याची तपासणीही केली जाईल. सगळी कागदपत्रे तपासली जात असून गुन्हा सिद्ध करण्यासाठी आवश्यक ती सर्व कारवाई केली जाईल. - नवनीत कॉवत, पोलीस अधीक्षक, बीड

### वक्फच्या इतिहासात पहिल्यांदाच

विशेष कौतुक करत त्यांचे अभिनंदन ही केलं.या वेळी पुढेही दरवर्षी वक्फचे ऑडिट पटलावर ठेवण्यास आम्ही कटिबद्ध राहू,असा विश्वास समीर काझी यांनी व्यक्त केला.

नागपुरात विधानसभेचे आठ दिवसीय हिवाळी अधिवेशन सुरू आहेत. तत्पूर्वी कलम-८१ अन्वये वक्फ मंडळाला दरवर्षी आपला लेखा परिक्षण विधानसभेच्या पटलावर ठेवणे अनिवार्य आहे.असे असतांना काही अडचणी व सुसूत्रता नसल्याने ऑडिट पत्तलावर ठेवले जात नव्हते.समीर काझी यांनी अध्यक्षपदाचा कार्यभार हाती घेतल्या नंतर लेखा परीक्षण विभागाला सक्षम करण्याचं निर्देश दिले.तसेच गेल्याच महिन्यात ऑडिट रिपोर्ट पत्तलावर ठेवण्या साठी तयारी करा,म्हणून आदेशीत कलम होते.मुख्यकार्यकारी अधिकारी जुनेद सय्यद यांनी तात्काळ या बाबत तयारी सुरू केली होती.त्या मुळेच २००२-३ ते २०१७-१८ कालावधीचा ऑडिट रिपोर्ट पटलावर ठेवण्यात आलंय.

### राज्यस्तरीय पुरस्कारा

मोबाईलवर, व्हॉट्सअॅपवर घेतले जाणार नाहीत. स्वत: किंवा पोस्टाने पाठवावेत. पुरस्कार वितरण सोहळा बीड येथे होणार आहे. विविध मान्यवरांच्या उपस्थित भव्य दिव्य घेण्यात येणार आहे. तरी या करिता संपुर्ण माहितीसह दि.१ जानेवारी २०२६ पर्यंत कश्मकश, दिव्य वार्ता कार्यालय, नगर परिषद, कॉम्पलेक्स, वनविभागाच्या कार्यालयाच्या बाजूला, शहेंशाह नगर, फारूक पटेल यांच्या घरासमोर या पत्यावर पाठवावेत असे आवाहन पुरस्कार निवड समितीचे प्रमुख संपादक मोहम्मद अबुबकर, पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष हाजी मुजतबा अहेमद खान, शेख तालीब, मोहम्मद इलियास टेलर, रफीक बागवान, इरफान कुरेशी, डॉ.सय्यस मसीहा, तला चाऊस, आसेफ सवार, मोहम्मद कासेफ, अब्दुल गनी बागवान, पठाण जैतुल्लाखान, खुर्शीद बागवान, सिराज खान पठाण, समीर सरकार, साजन चौधरी, शेख जावेद, सय्यद अकील, शेख शाकेर, सय्यद नदीम यांनी केले आहे.

### महाराष्ट्रात डीजे

सूचनेच्या माध्यमातून भारतीय यांनी हा मुद्दा उपस्थित केला. ध्वनी प्रदूषणामुळे ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, विद्यार्थी आणि लहान मुलांचे आरोग्य धोक्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. सोलापूरमध्ये प्रशासन, पोलिस आणि नागरिकांच्या सहकार्याने डीजेवर नियंत्रण आणण्यात यश आल्याचे उदाहरण त्यांनी दिले. आज सोलापुरात सर्व धार्मिक कार्यक्रमांमधून डीजे बाद झाला आहे. तेथे आपली पारंपारिक वाद्य वाजत आहेत. त्यामुळे राज्यभर अशाच प्रकारची अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावर उत्तर देताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी ध्वनी प्रदूषणाचा त्रास होतो, हे वास्तव असल्याचे मान्य केले. सोलापूर पॅटर्न निश्चितच कौतुकास्पद असल्याचे सांगत, ध्वनी मर्यादा ओलांडून तसेच रात्री दहा नंतर डीजे वाजवण्यास कोणतीही परवानगी नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. असे प्रकार घडतात ते अवैधरीत्या होत असल्याचे सांगून, तक्रार प्राप्त झाल्यास त्यावर कारवाई केली जाते, असेही मुंडे म्हणाल्या. तसेच, ध्वनी प्रदूषणाबाबत कारवाई करण्याचे अधिकार मुख्यतः पोलिसांकडे असल्याने पर्यावरण मंत्रालयाची भूमिका मर्यादित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (अप) चे आमदार अमोल मिटकरी यांनी राज्यात डीजेवर कायमस्वरूपी बंदी आणावी आणि सोलापूर पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्रात राबवावा, अशी ठाम मागणी केली. यावर उत्तर देताना मंत्री मुंडे यांनी, मंत्रालयाकडून सक्ती करता येत नसल्याचे सांगितले. हा निर्णय समाजाने स्वतःहून घ्यायला हवा, नागरिकांनी आणि लोकप्रतिनिधींनीही जनजागृती करावी, असं आवाहन त्यांनी केलं.